विशेष पोलीस वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ

दिनांक १०/११/२०२२

## निर्जनस्थळी नागरीकांना लुटमार करणारे दोन गुन्हेगारांना स्थानिक गुन्हे शाखेने केली अटक

मागील काही दिवसापासुन यवतमाळ शहरालगत असलेल्या निर्जन रस्त्याने जाणारे नागरीकांना धाकदपट करुन त्यांचे जवळील रोख रक्कम, मोबाईल, दागीने काढुन घेण्याच्या घटना घडलेल्या होत्या. सदर गुन्हयांचा नव्याने आढावा घेवुन समांतर तपास करण्याचे आदेश मा. श्री. डॉ. पवन बन्सोड, पोलीस अधीक्षक यवतमाळ यांनी पोलीस निरीक्षक प्रदिप परदेशी यांना दिले होते. त्या अनुषंगाने सायबर सेल यांचे मदतीने गुन्हयाची तांत्रीक माहीती प्राप्त करत असतांना दिनांक ०९/११/२०२२ रोजी स्थागुशा चे पथकास मुखबीरव्दारे मीळालेल्या माहीती नुसार यवतमाळ शहरातुन दोन इसमांना ताब्यात घेवुन विचारपुस करण्यात आली असता त्यांनी दिनांक १२/०५/२०२२ रोजी गोधणी रोडवरील ऑक्सीजन पार्क समोरील रोडवरुन जाणाऱ्या एका इसमाला मारहान करुन त्याचा मोबाईल, नगदी पैसे व चांदीचे ब्रेसलेट व चेन चे जबरीने हिसकावुन घेतल्याची कबुली दिल्याने आरोपीतांनी ज्या दोन व्यक्तीना मोबाईल गहाण म्हणुन किंवा विक्री करण्याकरीता दिलेला होता त्यांचे ताब्यातुन गुन्हयातील एक रेड मी कंपनीचा मोबाईल फोन किं.अं. ७०००/- रु चा जप्त करण्यात आला असुन पोलीस स्टेशन अवधुतवाडी अपराध क्रमांक ४५२/२०२२ कलम ३९२, ३४ भादवि चा गुन्हा उघडकीस आणण्याकरीता स्थागुशा चे पथकास यश आले असुन गुन्हयाचे पुढील तपास कामी आरोपीतांना पोलीस स्टेशन अवधुतवाडी यांचे ताब्यात देण्यात आले असुन पुढील तपास पोलीस स्टेशन अवधुतवाडी हे करीत आहेत. नमुद गुन्हयातील आरोपीत इसमा पैकी एक आरोपीत हा सराईत असुन त्यांचे कडुन आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक यवतमाळ डॉ. श्री. पवन बन्सोड, अपर पोलीस अधीक्षक श्री. पियुष जगताप, यांचे मार्गदर्शनात श्री. प्रदीप परदेशी पो.नि. स्थागुशा, सपोनि विवेक देशमुख, सपोनि विकास मुंडे ( सायबर सेल ) पोउपनि सागर भारस्कर, शाम बोपचे, बंडु डांगे, निलेश राठोड, विनोद राठोड, धनंजय श्रीरामे, महीला पोशी रोशनी जोगळेकर, प्रगती कांबळे ( सायबर सेल ), चालक नरेश राउत यांचे पथकाने याशस्वीरित्या पार पाडली आहे.

**टिप :-** कायदेशीर तांत्रीक अडचणी मुळे आरोपीतांची नावे जाहीर करण्यात आलेली नाही.

(शुभांगी गुल्हणे)
**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ**